**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे 1
दूरध्वनी क्रमांक 020-26124012 क्रमांक
do4.igro@igrmaharashtra.gov.in

---

क्र.का.4/उपाययोजना /2020/ दि. 19/05/2020.

**विषय- कार्यालयातील कामकाज करताना कोरणा विषाणू प्रतिबंधासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत.**

**संदर्भ - या कार्यालयाचे परिपत्रक का.4/उपाययोजना /2020 दिनांक 19/04/2020.**

**परिपत्रक**

दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाज करताना कोरोना विषाणू प्रतिबंधासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत सविस्तर सूचना संदर्भित परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या होत्या, सदरच्या सूचना तत्कालीन परिस्थितीनुरूप देण्यात आलेल्या होत्या. आजमितीस असलेल्या परिस्थितीचा विचार करून, उक्त परिपत्रकातील पुढील सूचनांमध्ये अंशतः बदल करण्यात येत आहे.

| अ. क्र | मूळ सूचना | सुधारित सूचना |
|---|---|---|
| ३.२) | नोटीस ऑफ इन्टिमेशनचे फिजिकल फायलिंग दि.२० मे पासून जुलै २०२० अखेरपर्यंत थांबवण्यात येत आहे. यासाठी नागरिकांना ई-फायलिंगचा पर्याय उपलब्ध आहे. [सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकाच्या (किमान त्यांच्या जिल्हा मुख्यालयाला) या बाबत तातडीने कळवावे व ई - फायलिंग सुविधा दि. २० मे पूर्वी उपलब्ध करून घेण्याच्या सूचना द्याव्यात.] | नोटीस ऑफ इन्टिमेशनचे फिजिकल फायलिंग दि.१० जून पासून ऑगस्ट २०२० अखेरपर्यंत थांबवण्यात येत आहे. यासाठी नागरिकांना ई-फायलिंगचा पर्याय उपलब्ध आहे. [ सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकाच्या (किमान त्यांच्या जिल्हा मुख्यालयाला) या बाबत तातडीने कळवावे व ई - फायलिंग सुविधा दि. १० जून पूर्वी उपलब्ध करून घेण्याच्या सूचना द्याव्यात.] |
| ३. ३) | वर्षाला ३००० पेक्षा जास्त दस्त असणाऱ्या कार्यालयामध्ये जुन २०२० अखेरपर्यंत :-<br>अ) मृत्यपत्र, वाटणीपत्र या नोंदणी वैकल्पिक असलेल्या तसेच हक्कसोडपत्र, नात्यातील बक्षीसपत्र,चुकदुरस्तीपत्र या कमी महत्वाच्या दस्तांची नोंदणी थांबवण्यात येत आहे. या प्रकारांपैकी, ज्या दस्तांची कलम २३ प्रमाणेची मुदत संपणार आहे तेच दस्त या कालावधीत नोंदणीसाठी स्वीकारता येतील.<br>ब) कार्यालयात कलम ५७ अन्वये शोध थांबवण्यात येत आहे. यासाठी नागरिकांना ई -सर्चचा पर्याय उपलब्ध आहे. | वर्षाला ३००० पेक्षा जास्त दस्त असणाऱ्या कार्यालयामध्ये जुन २०२० अखेरपर्यंत :-<br>अ) मृत्यपत्र, वाटणीपत्र या नोंदणी वैकल्पिक असलेल्या तसेच हक्कसोडपत्र, नात्यातील बक्षीसपत्र,चुकदुरस्तीपत्र या कमी महत्वाच्या दस्तांची नोंदणी कार्यालयात इतर प्रकारचे दस्त नोंदणीसाठी नसतील तर करण्यास हरकत नाही.<br>ब) कलम ५७ अन्वये शोध घेण्यासाठी ई -सर्चचा पर्याय उपलब्ध आहे याबाबत नागरिकांना माहिती द्यावी व शक्यतो त्या सुविधेचा वापर करण्यास प्रोत्साहीत करावे .<br>क) दस्ताची किंवा सूचीची प्रमाणित प्रत व |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | क) दस्ताची किंवा सूचीची प्रमाणित प्रत व मूल्यांकन अहवाल यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज करणे व फी भरणे थांबवण्यात येत आहे. पक्षकारांनी या कामासाठी अर्ज करणे, फी भरणे व नक्कलेची उपलब्धता जाणून घेणे यासाठी आपले सरकार वरील सेवेचा वापर करावा. | मूल्यांकन अहवाल यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज करणे व फी भरणे थांबवण्यात येत आहे. पक्षकारांनी या कामासाठी अर्ज करणे, फी भरणे व नक्कलेची उपलब्धता जाणून घेणे यासाठी आपले सरकार वरील सेवेचा वापर करावा. त्याप्रमाणे अर्ज करून फी भरलेल्या प्रकरणामध्ये नक्कल/ मुल्यांकन अहवाल घेण्यासाठी पक्षकारांना कार्यालयात येता येईल. |

याच अनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रक क्र. का. ५/स्पष्टीकरण/प्र. क्र. ६/२०/१४६/२० दि .२७/४/२०२० मधील मुद्दा क्र. ४ मधील दि. २० मे २०२० ही मुदत दि. १० जून २०२० अशी सुधारित करण्यात येत आहे .

**(ओमप्रकाश देशमुख)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
२. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
३. सर्व सह जिल्हा निबंधक/ मुद्रांक जिल्हाधिकारी
४. सर्व दुय्यम निबंधक/ विवाह अधिकारी ( सह जिल्हा निबंधक यांचे मार्फत )
५. सर्व कार्यसन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय.

प्रत: मा. अपर मुख्य सचिव, (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी),महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner